# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र 2826/शि.वि./2016
दि. 7/09/2016

प्रति,

देयक लिपीक,
झोन क्र. 1 ते 10,
महानगरपालिका, नागपूर.

**विषय :– शालेय किरायाच्या नस्ती तयार करून देयक अदा करण्याबाबतची कार्यवाही झोनस्तरावर करण्याबाबत.**

**संदर्भ :– मा.अपर आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांचे आदेश क्र.147/ओ.ॲन्ड.एम दि.30.11.2010.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, महानगरपालिका अधिनस्त काही शाळा ह्या किरायाच्या इमारतीत सुरू आहे. या इमारतीचा किराया दर महिन्यात घरमालकाला अदा करणे आवश्यक आहे. संदर्भिय आदेशाव्दारे शिक्षण विभागातील कार्याचे झोननिहाय विकेंद्रकरण करण्यात आले असून शाळेतील भौतिक सुविधाबाबतचे अधिकार झोनच्या सहा.आयुक्त यांना देण्यात आले आहेत. म्हणून आपल्या अधिनस्त झोनमधील सर्व किरायाच्या इमारतीत सुरू असलेल्या मनपा शाळांचे भाडे घरमालकाला दरमहा अदा करण्याबाबतची कार्यवाही झोनस्तरावर करण्यात यावी. यामध्ये कॉन्टीजंट बिल तयार करणे, त्याचे ई–गव्हनर्स करणे इत्यादी कार्य त्वरीत आपण करावे.

महानगरपालिका अधिनस्त उपरोक्त शाळांबाबत किराया वाढीची प्रकरणे तयार करणे व हाताळणे हे सुध्दा कार्य देयक लिपीक यांना देण्यात येत आहे. आपल्या झोनमधील ज्या मनपा मालकीच्या शाळा इमारती/वर्गखोल्या दुसऱ्या संस्थांना भाडेतत्वावर दिलेल्या आहेत. त्याबाबतच्या शाळा निरीक्षक यांचेकडे असलेल्या, संबंधित पूर्ण नस्त्या झोन स्तरावर आपल्याकडे सुपूर्द करण्यात येत आहे. त्याबाबतचे भाडे वसूल करणे व भाडे निश्चिती व पुनःनिर्धारण झोन स्तरावर आपण करावे. काही अडचण आल्यास झोनचे शाळा निरीक्षक यांची मदत घ्यावी.

(फारूक अहमद खान)
**शिक्षणाधिकारी,**
**महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलिपी :–**

1) मा.उपायुक्त–1, म.न.पा.नागपूर यांना माहितीस्तव सादर.
2)सहा.आयुक्त, झोन क्र. 1 ते 10, म.न.पा., नागपूर यांना उचित कार्यवाहीस्तव.
3)शाळा निरीक्षक, झोन क्र. 1 ते 10, म.न.पा., नागपूर यांना उचित कार्यवाहीस्तव.

(फारूक अहमद खान)
**शिक्षणाधिकारी,**
**महानगरपालिका, नागपूर**